


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २७५ ●रविवार,दि.०४ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# गोर गरीबांना संधी देण्याची मुख्यमंत्र्यांची मनस्थितीतच नाहीय

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जाणूनबुजून लेकरांचं वाटोळं करत आहेत: जरांगे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

एमपीएससीच्या पीसीआय परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना वयोमर्यादा वाढवून देण्याची मागणी गेल्या काही दिवसांपासून जोर धरते आहे. ४ जानेवारी रोजी ही परीक्षा होणार आहे. मात्र, सरकारकडून अद्याप कोणताही निर्णय जाहीर झालेला नाही. त्यामुळे, परीक्षा द्यायची की नाही या संभ्रमात विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांना मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मोलाचा सल्ला दिला आहे. मनोज जरांगे म्हणाले, गोर गरीबांना संधी देण्याची मुख्यमंत्र्यांची मनस्थितीतच नाहीय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जाणूनबुजून लेकरांचं वाटोळं करत आहेत. ते म्हणतात की आम्ही या पोरांना वाऱ्यावर सोडणार नाहीत, त्यामुळे आता पाहूयात.

परीक्षा केंद्र गाठा- विद्यार्थ्यांनी परीक्षेला जावं की नाही, याबाबत विचारलं असता ते म्हणाले, मी याबाबत काहीही आवाहन करू शकत नाही. कारण, या आंदोलनाचं नेतृत्त्व मी करत नाही. या आंदोलनाचं नेतृत्त्व करणाऱ्यांनी काय ठरवलं आहे ते मला माहीत नाही. पण मी विद्यार्थ्यांना सांगू इच्छितो की त्यांनी परीक्षेला जावं. केंद्रावर पोहोचेपर्यंत परीक्षा रद्द झाल्या तर तुमच्या जाण्या-येण्याच्या तिकिटाचा खर्चच वाया जाईल, किंवा परीक्षा रद्द झाल्या नाही तर तुम्ही पेपर देऊ शकता. पण गेलाच नाहीत तिकडे तर तुमचं दुहेरी नुकसान होऊ शकतं. त्यामुळे धडक उठायचं, आपली एसटी धरायची आणि जिथे आपलं केंद्र आहे तिथे पेपरला जायचं.

दरम्यान, मी सरकारशी चर्चा करतो, कसे परीक्षा घेतात तेही पाहतो. मुलांचं जीवन उद्ध्वस्त करण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना नाही, असं मनोज जरांगे पाटील काल (२ जानेवारी) म्हणाले होते.

# परळी मतदारसंघातील जनतेचे जोपर्यंत आशीर्वाद व प्रेम आहे...

## तोपर्यंत कुणी माझे काही बिघडवू शकत नाही : धनंजय मुंडे

**परळी वै. । प्रतिनिधी**

अनेक लोक आपली चांगल्या कामांमुळे ओळख ठेवतात. परळी विधानसभेची निवडणूक मी प्रचंड बहुमतांनी विजयी झाल्यानंतर अनेकांनी मला खाली ओढण्याचा, राजकारणातून संपवण्याचा प्रयत्न केला, मात्र या भागातील जनतेचे प्रचंड प्रेम व आशीर्वाद जोपर्यंत माझ्या पाठीशी आहेत तोपर्यंत माझे कुणी काही बिघडवू शकत नाही; असे उद्गार माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी परळी तालुक्यातील धर्मापुरी येथील जिजामाता विद्यालयात बोलताना काढले आहेत. धर्मापुरी येथील



इंद्रायणी प्रतिष्ठान व सरस्वती नागरगोजे प्रतिष्ठान यांच्यावतीने जिजामाता माध्यमिक विद्यालय येथे शिक्षण महर्षी गौतमराव बापू नागरगोजे तसेच शिवशला माई नागरगोजे यांच्या पुण्यस्मरण सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित विविध ▶ उर्वरित पान २ वर

● **धर्मापुरी येथील सोयाबीन संशोधन केंद्रास लवकरच वाढीव निधीची प्रशासकीय मान्यता – मुंडेंची माहिती**

● **धनंजय मुंडे यांनी लोकप्रियताही लोकांच्या सेवेतून मिळवली त्यामुळेच ते मोठे नेते – अभिनेते संदीप पाठक**


● **धर्मापुरी येथील जिजामाता विद्यालयात गौतम बापू नागरगोजे यांच्या पुण्यस्मरण सोहळ्याच्या निमित्ताने विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण संपन्न**

# आ.प्रकाश सोळंकेंचा पुन्हा एकदा वडवणीकरांना झोळी भरुन निधी

## वडवणीतील सीसीटीव्हीसाठी ३ कोटी तर चिंचवणच्या तीन मंदिरांसाठी ९ कोटींचा निधी ; नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी दिली माहिती

**वडवणी । प्रतिनिधी**

बोले तैसा चाले, त्यांची वंदावी पावले. याच उक्तीप्रमाणे वडवणीकरांसाठी माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी वडवणीकरांना प्रत्येक वेळी दिलेल्या शब्दाप्रमाणे आपली कृती प्रत्यक्षात उतरवलेली आहे. आपला कामाचा माणूस याप्रमाणे प्रकाशदादांनी पुन्हा



एकदा वडवणीकरांना अक्षरशः झोळी भरुन निधी दिला असून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ योजनेंतर्गत वडवणीतील सीसीटीव्ही बसविण्यासाठी ३ कोटी तर चिंचवणच्या तीन मंदिरांच्या जिर्णोध्दारासाठी ९ कोटींचा निधी असा एकूण तब्बल १२ कोटी रुपयांचा निधी देण्यास अंतिम प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या माध्यमातून आ.प्रकाश सोळंकेंचे आपल्या मतदारसंघातील वडवणीवर पुन्हा विशेष प्रेम दिसून आले. याबाबत अधिक माहिती अशी की, माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या माध्यमातून सध्या वडवणी शहरासह तालुक्याचा चौफेर विकास दृष्टीक्षेपास पडत असून विविध नवनविन विकास कामांमुळे वडवणीचे रुपडे पालटताना ▶ उर्वरित पान २ वर

# नवनिर्वाचित बीड नगराध्यक्षा प्रेमलता पारवे यांनी केले पदग्रहण

## छोटेखानी समारंभात त्यांनी पदभार स्वीकारला



**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसंग्राम युतीच्या नवनिर्वाचित बीड नगराध्यक्षा सौ. प्रेमलताताई पारवे यांनी पदभार स्वीकारला आहे. बीड नगर परिषद निवडणुकीत शहरातील मतदार बंधू-भगिनींनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवत शहराच्या विकासासाठी काम करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे राजकीय टीका-टिप्पणी टाळून भूतकाळावर चर्चा करण्यापेक्षा शहरातील नागरिकांना शाश्वत विकासाची हमी देत त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी एकत्रित प्रयत्न करूया, असा विश्वास यावेळी शिवसेनेचे नेते अनिल जगताप यांनी व्यक्त केला. रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, वीज यांसारख्या मूलभूत सुविधा सक्षमपणे उपलब्ध करून देण्यासाठी ▶ उर्वरित पान २ वर

# जायकवाडी वसाहतीवर बुलडोझर फिरण्याचा इशारा

## १० वी, १२ वी परीक्षेच्या काळात घर रिक्त करण्याविरोधात नागरिकांची मागणी



**तलवाडा । प्रतिनिधी**

पाटबंधारे विभागाच्या जायकवाडी सिंचन वसाहतीमध्ये अनेक ठिकाणी अनेक जण अतिक्रमण करून राहात आहेत. या घरांवर बुलडोझर फिरवणार असल्याचे जायकवाडी सिंचन, जातेगाव शाखा क्रमांक ५ चे शाखाधिकारी नागेश एच. गट्टूवार यांनी पत्रकाद्वारे कळवले आहे. सध्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षा सुरू असून, कडाक्याची थंडीही आहे. अशावेळी घर रिक्त करून लोकांना व शालेय विद्यार्थ्यांना बाहेर काढल्यास त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागेल. त्यामुळे या घरांना रिक्त करण्यासाठी ▶ उर्वरित पान २ वर

# अंबासाखर कारखाना परिसरातील कुऱ्हाड हल्ल्यातील जखमीचा मृत्यू

## आरोपीवर आता खुनाचा गुन्हा



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरालगतच्या अंबासाखर कारखाना परिसरात जुन्या भांडणाच्या कारणावरून झालेल्या कुऱ्हाड हल्ल्यातील गंभीर जखमी धनराज ओमप्रकाश कांबळे यांचा अखेर मृत्यू झाला आहे. लातूर येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना शनिवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून आता या प्रकरणात आरोपीवर खुनाचे कलम वाढवण्यात येणार असल्याची माहिती ▶ उर्वरित पान २ वर

# घरात घुसून धारदार वस्तऱ्याने हल्ला ; दाम्पत्याला मारहाण

**परळी । प्रतिनिधी**

जुन्या भांडणाचा राग मनात धरून शेजाऱ्याने थेट घरात घुसून धारदार वस्तऱ्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना परळी शहरातील कंडक्टर कॉलनीत घडली आहे. या हल्ल्यात वृत्तपत्र विक्रेते उद्धव विनायकराव हाडवे (वय ३९) हे गंभीर जखमी झाले. त्यांच्या डाव्या कानावर व गालावर गंभीर दुखापत झाली आहे. या प्रकरणी परळीतील संभाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत उद्धव हाडबे यांनी नमूद केले आहे की, ते पत्नी व दोन मुलांसह कंडक्टर कॉलनीतील रामराव तारडे ▶ उर्वरित पान २ वर



*बीड : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त भाजपच्या नगरसेविका तथा गटनेत्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी शहरातील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नगरसेवक शुभम धूत, नितीन साखरे, सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष किशोर राऊत, समता परिषदेचे शहराध्यक्ष निखिल शिंदे यांच्यासह पदाधिकारी, समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

# आता कुत्र्यांचे सर्वेक्षण ही शिक्षकांच्या माथी

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षकांना शैक्षणिक सोबतच जनगणना, मतदारयादी असे विविध कामे बोकांडी मारली जात आहेत. आता तर शासनाने हद्दच केली असून भटक्या कुत्र्यांच्या सर्वेक्षणाची जबाबदारी शिक्षकांच्या माथी मारली असल्याने याबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. शैक्षणिक संस्थांच्या परिसरात आढळणाऱ्या भटक्या कुत्र्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये नोडल अधिकारी म्हणून मुख्याध्यापक तर सर्वेक्षणासाठी शिक्षकांची नियक्ती करण्याचे आदेश राज्यातील शिक्षण ▶ उर्वरित पान २ वर











# मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले

सावित्रीबाईंचे पती जोतीराव यांना लहानपणापासूनच मातृप्रेम लाभले नाही. त्यांची मावस आत्या सगुणाऊ यांनीच त्यांचा सांभाळ केला होता. सगुणाऊ एका इंग्रज अधिकाऱ्याच्या मुलाच्या दाई म्हणून काम करायच्या. त्यांना इंग्रजी कळायचे व बोलताही यायचे. त्यांनी आपल्या या ज्ञानाचा उपयोग जोतीरावांना प्रेरित करण्यासाठी केला. जोतीरावही शिक्षणाकडे आकर्षित झाले. सावित्रीबाईंना ख्रिश्चन मिशनऱ्यांनी लग्नापूर्वी दिलेले एक पुस्तक त्या सासरी घेऊन आल्या होत्या. त्यावरून जोतीरावांनाही एक नवा मार्ग सापडला. त्यांनी स्वतः शिकून सावित्रीबाईंना शिकवले. सगुणाऊ तर सोबत होतीच. दोघींनी रीतसर शिक्षण घेतले.१ मे, इ.स. १८४७रोजी सावित्रीबाईंनी सगुणाऊला मागासांच्या वस्तीत एक शाळा काढून दिली. ही त्यांची पहिली शाळा. गुणाऊंना त्या शाळेत बोलाविण्यात आले. सगुणाऊ तेथे आनंदाने व उत्साहाने शिकवू लागल्या. पुढे ही पहिली शाळा मध्येच बंद पडली. १ जानेवारी, इ.स. १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात जोतीराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. साऱ्या कर्मठ मनुवादी समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहानंतर शिक्षण घेतले आणि शिक्षक, मुख्याध्यापक बनून शिक्षण दिले. केवळ चार वर्षांत १८ शाळा उघडल्या आणि चालवल्या. तत्कालीन ब्रिटिश भारतातली एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली.यापूर्वी मिशनऱ्यांनी आणि अन्य लोकांनी काढलेल्या १४–१५ शाळा उत्तर भारतात होत्या.या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्यातील अन्य भागांतही २–३ मुलींच्या शाळा त्यांनी सुरू केल्या व काही काळ चालवल्या. मुंबईतल्या गिरगावातही त्याच सुमारास स्टूडन्ट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीने 'कमळाबाई हायस्कूल' नावाची मुलींसाठीची शाळा सुरू केली. मिशनरी नसलेले पिअरी चरण सरकार यांनी मुलींसाठी पहिली शाळा बारासात टाऊन येथे १८४७ मध्ये काढली. शाळेसाठी नवीन कृष्ण मित्र आणि काली कृष्ण मित्र या दोन भावांनी आर्थिक मदत केली. ही शाळा कालीकृष्ण हायस्कूल या नावाने चालू आहे. मुंबईत पारशी लोकांनी १८४९ मध्ये मुले आणि मुलींसाठी पहिली सहशिक्षण शाळा काढली, पण काही दिवसातच या शाळेच्या मुलांसाठी आणि मुलींसाठी अशा दोन शाखा झाल्या. सावित्रीबाईंच्या शाळेत सुरुवातीला शाळेत सहा मुली होत्या, पण १८४८ साल संपेपर्यंत ही संख्या ४०–४५ पर्यंत जाऊन पोहोचली. या यशस्वी शाळेचे स्वागत सनातनी उच्च वर्णीयांनी धर्म बुडाला.... जग बुडणार.... कली आला.... असे सांगून केले. कर्मठ सनातन्यांनी विरोध केला, अंगावर शेणही फेकले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. पण अनेक संघर्ष करत हा सावित्रीबाईंचा शिक्षणप्रसाराचा उपक्रम चालूच राहिला. त्यासाठी त्यांना घर सोडावे लागले. सगुणाऊ सोडून गेली. अनेक आघात होऊनही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत.त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन!

**–सौ.संध्या सरवदे**
**(लेखिका सामाजिक क्षेत्रात काम करतात)**

# परिस्थिती बदलणे शक्य आहे,विश्वास स्वतःवर हवा...

आज पासून २५ वर्षांपूर्वी एका शाळेत शिक्षक शिकवत होते, बाहेर पाऊस पडत होता.वातावरण एकदम मस्त मनमोहक होतें. शिक्षकाला वाटले चला या वातावरणात मुलांना थोडं गप्पा मारायची मोकळीका घेऊया.त्यांनी सर्व मुलांना शाळेच्या व्हरांड्यात बोलावलं,तिथे गप्पा रंगात आल्या आणि शिक्षकाने आपल्या खिशातून एक शंभर रुपयाची नोट काढली व टेबलावर ठेवली.आणि मुलांना म्हणाले ,मुलांनो ही शंभराची नोट आहे,मी आपल्यापैकी जो याचा चांगला उपयोग करेल त्याला देणार. मुले वका सुरात म्हणाली हो गुरुजी.प्रत्येक मुलाला शिक्षक विचारू लागले,काही मुले म्हणाली आम्ही याचा सर्वांसाठी खाऊ आणू,कोणी म्हणाल खेळण्याच्या वस्तू आणू,मी माझ्या वडिलांना देईन...असे वेगवेगळी उत्तरे प्रत्येक मुलांकडून येत होती.त्यातील एका मुलाने हात वर केला व म्हणाला गुरुजी हे शंभर रुपये जर मला मिळाले तर मी माझ्या आईसाठीएक




चष्मा खरेदी करेल कारण तिला दिसत नाही. त्यावर शिक्षक म्हणाले तुझ्या आईला चष्मा तर तुझेवडील पण आणू शकतील त्यात काय नवल.त्यावर सगळी मुलं हसू लागली.त्यावर तो मुलगा शांतपणे म्हणाला गुरुजी मला वडील नाहीत,माझ्या आईला कमी दिसते ती कपडे शिवते,दिवसभर मजुरी करते व सकाळ संध्याकाळ धुणीभांडी करते.त्यामुळे तिला दिसावे म्हणून मी या शंभर रुपयायातून तिला चष्मा घेईन.हे ऐकून शिक्षक व सगळे विद्यार्थी सुन्न झाले,वातावरण एकदम गहिवरले झाले. शिक्षक शांतपणे उठून त्या मुलाजवळ गेले आणि म्हणाले,बाळा हे शंभर रुपये तुला मी आज देत आहे यातून तू तुझ्या आईला चष्मा घे पण माझी एक अट आहे,जेंव्हा तू स्वतः कमावता होशील तेंव्हा मला हे शंभर रुपये तू परत कर.मुलाने होकार देऊन ते शंभर रुपये घेतले.शाळा सुटली. पुढे काही वर्षांनी सगळी मुले शिक्षण पूर्ण करून आपापल्या भविष्यासाठी निघून गेली.बरोबर २५ वर्षांनी त्याच शाळेत वर्ग सुरू असताना अचानक शाळेत एक लाल दिव्याची गाडी येऊन थांबली,तेच गुरुजी एका वर्गात शिकवत होते त्यांचा शेवटचा महिना होता सेवेचा.सगळी शाळा त्या गाडीकडे धावू लागली त्या गाडीतून एक रुबाबदार व्यक्ती बाहेर पडली ती जिल्हाधिकारी होती.सगळ्यांनी त्यांचं स्वागत केलं आता प्रत्येकाला वाटू लागलं हे साहेब कोणत्या वर्गात शिरतील...पण त्यांनी त्याच शिक्षकांची नावाने चौकशी केली तिथे गेले नम्रपणे त्यांनी त्या शिक्षकास वाकून नमस्कार केला.शिक्षकाने आशीर्वाद दिला.त्यांनी विचारलं कोण रे बाबा तू ओळखलं नाही ? कलेक्टर म्हणाले गुरुजी मी तोच विद्यार्थी ज्याला तुम्ही शंभर रुपये दिले होते ते मी आज आपल्याला परत करायला आलो आहे.आणि आपल्या शिकवणुकीणे मला दिशा दिली मी आज आपल्या जिल्ह्याचा कलेक्टर आहे.मित्रांनो आपल्याला जर खरच पुढे जायचे असेल तर परिस्थिती अडचण नाही कारण ती बदलण्याचे सामर्थ्य आपल्या हातात आहे,फक्त स्वतःवर विश्वास असावा.धन्यवाद

**–सुभाष राठोड, शिक्षक**
**रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव मो.९०११८५८४८५**

◆ पान ९ वरून पुढे...

## परळी मतदारसंघातील....

सामाजिक उपक्रम व शैक्षणिक स्पर्धांच्या समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या निमित्ताने श्री धनंजय मुंडे बोलत होते. गौतम बापू नागरगोजे यांनी ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा आणली. त्याकाळी राजकारणात त्यांना पदे मिळवणे सहज सोपे असताना त्यांनी पदे मिळवण्याच्या ऐवजी शिक्षणाची चळवळ मोठे करणे निवडले. त्यांचे आणि मुंडे कुटुंबाचे दोन पिढ्यांचे ऋणानुबंध आहेत. गौतम बापूंनी उभारलेल्या या शैक्षणिक चळवळीतून अनेक चांगले नागरिक, अनेक चांगले विद्यार्थी, अधिकारी इत्यादी घडले, याचा अभिमान असल्याचेही धनंजय मुंडे यावेळी बोलताना म्हणाले. या भागाचा लोकप्रतिनिधी म्हणून या भागातील विकास कामांना गती देण्याचे काम मी केले व करतो आहे. मागील वर्षी मी कृषिमंत्री असताना अनेकांचा विरोध पत करून धर्मापुरी येथे सोयाबीन संशोधन व प्रक्रिया केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अधिक उत्पादन क्षमतेचे बियाणे तयार करण्यापासून ते सोयाबीन वरती प्रक्रिया करून विविध उत्पादनांना अधिकाधिक भाव मिळवून देण्यापर्यंत असा शेतकऱ्यांचा बहुअर्थाने फायदा होणार असून त्यांच्या उत्पन्नात वृद्धी सुद्धा होणार आहे, त्यामुळे या सोयाबीन संशोधन केंद्राच्या उभारणीसाठी पूर्वी मंजूर केलेल्या निधीमध्ये आणखी वाढ करून वाढीव प्रशासकीय मान्यता लवकरच प्रदान करण्यात येईल व त्यानंतर याच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात होईल असेही प्रतिपादन यावेळी धनंजय मुंडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित असलेले बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र व सिंह अभिनेता येतात हा प्रसिद्ध नाट्य कलाकार संदीप पाठक यांनी धनंजय मुंडे यांच्या मैत्री व राजकीय कारकीर्दीवर प्रकाश टाकला. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यापासून समाजकारण व राजकारणाचे बाळकडू घेतलेले धनंजय मुंडे हे लोकसेवेतून लोकप्रिय झालेले आहेत त्यामुळे ते मोठे नेते असून. देवाक काळजी रे, या गाण्यातील ओळींप्रमाणे मागे काय झाले ते विसरून आता पुढे आणखी चांगले काय होणार आहे याकडे लक्ष केंद्रित रहावे असे गौरवोद्गार श्री संदीप पाठक यांनी काढले. यावेळी संदीप पाठक यांनी त्यांच्या जगप्रसिद्ध असलेल्या वऱ्हाड निघाले लंडनला या नाटकाची झलकही स्वतः अभिनय करून दाखवली. तर या पुण्यस्मरण सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांच्या बक्षिसांचे वितरण धनंजय मुंडे श्री संदीप पाठक यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर धर्मापुरीचे सरपंच ऍड गोविंदराव फड, कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्करराव नागरगोजे, संस्थेचे सचिव विजयकुमार नागरगोजे, डॉ. सरस्वतीताई नागरगोजे, प्राचार्य गित्ते यांच्यासह परिसरातील पदाधिकारी स्थानिक नागरिक व संस्थेच्या विविध विद्यालयांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆ पान ९ वरून पुढे...

## आ.प्रकाश सोळंकेंचा....

दिसून येत आहे. तालुक्यातील जनता या विकास कामांवर समाधानी असून यामुळे आपल्या शब्दाचे पक्के असणाऱ्या प्रकाशदादांना वडवणीकर धन्यवाद देत आहेत. वडवणी येथील एका कार्यक्रमामध्ये वडवणी शहराचे नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप यांनी स्वतः आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या समक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे वडवणी शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यासाठी २ कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा, तसेच वडवणी शहरात सध्या अत्यंत आकर्षक अशा बांधकाम सुरु असणाऱ्या नविन नगरपंचायत प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी कमी पडत असलेल्या उर्वरित कामासाठी २ कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा अशी आग्रही मागणी केली होती. त्यांच्या याच मागणीची आता पूर्तता झालेली असून नुकतेच सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२५–२६ योजनेंतर्गत वडवणी तालुक्यामध्ये विविध ठिकाणी सीसीटीव्ही आस्थापित करणे यासाठी तब्बल ३ कोटींचा निधी तसेच चिंचवण येथील जगदंबा मंदिर जिर्णोध्दारासाठी ३ कोटी २८ लक्ष ८४ हजार रुपये निधी व चिंचवण येथीलच महादेव व विठ्ठल रुक्मिणी मंदिर जिर्णोध्दारासाठी ५ कोटी १५ लक्ष ५० हजार रुपयांचा निधी अशाप्रकारे चिंचवण येथील तिन्ही मंदिरांच्या जिर्णोध्दारासाठी तब्बल एकूण ८ कोटी ४४ लक्ष ३५ हजार रुपयांचा निधी व दोन्ही कामांसाठी एकूण तब्बल १२ कोटी रुपयांचा निधी देण्यास अंतिम प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वडवणी नगरपंचायतीच्या बांधकाम सुरु असलेल्या नव्या प्रशासकीय इमारतीच्या उर्वरित कामांसाठीही उर्वरित १ कोटी रुपयांचा निधी लवकरच मिळणार आहे. तसेच आता वडवणी शहराच्या वैभवात आणखी भर घालण्यासाठी व नागरिकांच्या सोयीसाठी शहरातील मुख्य रोडवरवरील दुभाजकांमध्ये ठिकठिकाणी हायमास्ट स्ट्रीट लाईट पथदिवे बसविण्यासाठी आवश्यक असणारा कोट्यावधी रुपयांचा निधीही लवकरच वडवणी शहरासाठी देणार असल्याचा शब्दही आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी दिला असल्याची माहिती वडवणी नगरीचे नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप यांनी दिली आहे.

## नवनिर्वाचित बीड....

सर्वांनी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. याप्रसंगी महायुतीचे शहरातील सर्व पदाधिकारी, नवनिर्वाचित नगरसेवक, मुख्याधिकारी, नगर परिषदेचे अधिकारी–कर्मचारी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व महायुतीचे कार्यकर्ते तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆ पान ९ वरून पुढे...

## जायकवाडी वसाहतीवर...

काही दिवसांचा अतिरिक्त कालावधी देण्याची मागणी भाजपा नेते व माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केली आहे. जायकवाडी सिंचन वसाहत ही मूळतः जायकवाडीतील कर्मचार्यांना राहण्यासाठी उभा करण्यात आली होती. मात्र, या घरे मूळ कर्मचार्यांना न देता, गेल्या अनेक वर्षांपासून इतर लोक आपले कुटुंब घेऊन येथे राहत आहेत. या इमारती मोडकळीस आल्या असून, काही ठिकाणी अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे शाखाधिकारी नागेश गट्टूवार यांनी तात्काळ घर रिक्त करण्याचे पत्रक जारी केले आहे. परंतु, सध्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षा सुरू असल्यामुळे, मुलांना तसेच त्यांच्या पालकांना अचानक घर रिक्त करण्यास सांगणे शैक्षणिक तसेच सामाजिक दृष्ट्या हानिकारक ठरेल. नागरिकांनी याबाबत आपली व्यथा माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यासमोर मांडली आहे. जायकवाडी वसाहत असलेल्या राक्षसभुवन, धोंडराई, बागपिंपळगाव, तलवाडा, जातेगाव आणि टाकरवन या परिसरातील नागरिकांनी असा इशारा दिला आहे की, घर रिक्त करण्याची वेळ वाढवली नाही, तर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यास ते तयार आहेत. याबाबत तात्काळ दखल घेत, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी संबंधित विभागाचे कर्मचारी अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून, १० वी व १२ वी परीक्षेच्या काळाचा तसेच थंडीचा विचार करून नागरिकांना काही दिवसांचा वेळ वाढवण्याची मागणी केली आहे. तसेच, या प्रकरणावर पुढील चर्चा करण्यासाठी ते राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशीही भेट घेणार आहेत. सध्या या निर्णयामुळे संबंधित नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. घर रिक्त करणे किंवा रस्त्यावर येणार्या कुटुंबांबाबत प्रशासनाने विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे, असा नागरिकांचा विश्वास आहे.

## अंबासाखर कारखाना...

पोलिसांनी दिली. अंबासाखर कारखाना परिसरातील गणेश गाळुंके यांच्या चप्पल दुकानासमोर २९ डिसेंबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास हा रक्तरंजित थरार घडला होता. आरोपी समीर सिकंदर पठाण याने जुन्या भांडणाची कुरापत काढून धनराज ओमप्रकाश कांबळे यांच्या डोक्यात कुऱ्हाडीचे घाव घातले होते. हा हल्ला इतका भीषण होता की धनराज जागीच रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. भांडण सोडवण्यासाठी गेलेला अक्षय परमेश्वर कणसे या तरुणालाही आरोपीने लोखंडी हातोड्याने मारहाण करून जखमी केले होते. गंभीर जखमी धनराजवर लातूर येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते, मात्र सहा दिवसांच्या झुंझीनंतर त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी मृत धनराजचा भाऊ युवराज ओमप्रकाश कांबळे याने अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

◆ पान ९ वरून पुढे...

पोलिसांनी आरोपी समीर सिकंदर पठाण याला यापूर्वीच अटक केली असून त्याच्याविरुद्ध गुन्हा प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल आहे. धनराजच्या मृत्यूनंतर आता या गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेनुसार खुनाचे कलम वाढवण्यात येणार असल्याची माहिती सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी दिली आहे. या घटनेचा पुढील तपास स्वतः ऋषिकेश शिंदे करीत आहेत.

## घरात घुसून...

यांच्या घरी भाड्याने वास्तव्यास असून वृत्तपत्र एजंट म्हणून काम करतात. २४ डिसेंबर २०२५ रोजी रात्री त्यांच्या पत्नी राजश्री या घरी एकट्या असताना शेजारी रा–हणारे सुनील राऊत व त्याची पत्नी रूपाली राऊत यांच्यात वाद झाला होता. या वादाची तक्रार देण्यासाठी दोघे पोलिस ठाण्यात आले असता राजश्री यांची तब्येत बिघडल्याने पोलिसांनी उपचारासाठी रुग्णालयात पाठवले होते. त्यानंतर कौटुंबिक कारणामुळे ते पुण्याला गेले होते. ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी पुण्याहून परतल्यानंतर उद्धव हाडवे आपल्या कामासाठी बाहेर गेले होते. सायंकाळी सुमारे ५.४५ वाजण्याच्या सुमारास, ते घरी झोपले असताना, शेजारी राहणारा सुनील राऊत अचानक त्यांच्या घरात घुसला. त्याच्या हातात दाढी करण्याचा धारदार वस्तरा होता. जुन्या भांडणाचा राग मनात धरून त्याने उद्धव हाडबे यांच्या डाव्या कानावर व डाव्या गालावर वार करून गंभीर दुखापत केली. मोठ्याने आरडाओरडा केल्यावर घरमालक रामराव तारडे व परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. याच वेळी आरोपीची पत्नी रूपाली राऊत हिनेही घरात बेकायदेशीर प्रवेश करून उद्धव हाडबे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.जमलेल्या नागरिकांनी हस्तक्षेप करून हाडबे यांची सुटका केली. जखमा गंभीर व मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत असल्याने पोलिसांनी त्यांना तत्काळ उपचारासाठी दाखल केले. या प्रकरणी सुनील राऊत व रूपाली राऊत यांच्याविरुद्ध बेकायदेशीर घरात प्रवेश, धारदार शस्त्राने मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास संभाजीनगर पोलिस करीत आहेत.

## आता कुत्र्यांचे...

संचालनालयाने दिले आहेत. यामुळे शिक्षक संघटनांनी आणि पालकांनी या निर्णयाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. सध्या शाळांत विविध स्पर्धा, घटक चाचणी, विज्ञान प्रदर्शन आणि इतर अभ्यासक्रमांची तयारी सुरू आहे. तसेच दहावी आणि बारावीच्या पूर्व परीक्षांची तयारी सुरु आहे. अशा वेळी शिक्षकांना अन्य कामांत गुंतवून ठेवल्यास अध्यापनावर परिणाम होईल, असा आक्षेप शिक्षकांकडून घेतला जात आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## संत वामनभाऊ...

घटनेला यंदा ५० वर्षे पूर्ण होत असून, यावर्षी शनिवारचा शुभयोग लाभल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. प.पू. विठ्ठल महाराज यांनी संतांची मठपरंपरा अखंडपणे जपली असून भक्ती, सेवा आणि अध्यात्माची परंपरा पुढे नेण्याचे कार्य अविरत सुरू ठेवले आहे. शनिवारी सकाळी होम–हवनाने या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याची सुरुवात झाली असून दैनंदिन अखंड कीर्तनसेवा सुरू असणार आहे. हा सप्ताह १० तारखेपर्यंत चालणार असून समारोपाच्या दिवशी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कालावधीत महाराष्ट्रासह विविध भागांतून लाखो भाविक गहिनीनाथ गड येथे दर्शनासाठी उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला असून, संत वामनभाऊ महाराजांच्या विचारांचा आणि भक्तीमार्गाचा जागर या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मोठ्या श्रद्धेने साजरा केला जात आहे.

## जिल्हाध्यक्ष राजेंद्र...

वस्तीला जाणारा रस्ता खड्डा व उताराचे अवघड बनला आहे .त्यामुळे पावसाळ्यात पाणी साचून वाहतुकीसाठी ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत होती. मागील अतिवृष्टीमध्ये वस्तीच्या चहुबाजूने पाणी साचल्याने नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागला होता. या परिस्थितीवर तोडगा म्हणून राजेंद्र मस्के यांनी स्वखर्चातून ६ फूट रुंद आणि १० फूट लांबीच्या आठ नळ्यांचा मजबूत नळकांडी पूल बांधण्याचे काम हाती घेतले आहे. जाधववस्तीवरील लोकांना रस्त्याअभावी हाल होऊ नयेत म्हणून हे काम मी स्वखर्चातून सुरू केले आहे. मंजुरी किंवा निधीअभावी जनतेचे प्रश्न प्रलंबित राहू नयेत, हेच माझे उद्दिष्ट आहे, असे मत जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी यावेळी व्यक्त केले. त्यांनी पुढे सांगितले की, ग्रामस्थांची मागणी आपण जिल्हा प्रशासनाकडे केली होती, मात्र निधी न मिळाल्याने स्वखर्चातून हे काम करून ग्रामस्थांची गैरसोय दूर करत आहोत. या उपक्रमामुळे मोरगाव–जाधववस्ती दरम्यानचा रस्ता सुलभ झाला असून, नागरिकांना वर्षानुवर्षे भेडसावत असलेली समस्या संपुष्टात आली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी राजेंद्र मस्के यांच्या लोकाभिमुख कार्याचे कौतुक करत त्यांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.

## श्रीमती शोभा....

आहेत. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने व प्रामाणिकपणे विविध उपक्रम श्रीमती शोभा दळवी मॅडमने राबवले आहेत. आयडॉल शिक्षिका म्हणून देखील मॅडमची यावर्षी निवड झाली आहे. साहित्य निर्मिती, तंत्रस्नेही शिक्षण, नवोपक्रम,आनंददायी शिक्षण, प्रयोग, इंग्लिश ऍक्टिव्हिटी, स्पर्धा परीक्षा, लोकसहभाग इत्यादी अनेक

◆ पान ४ वरून पुढे...

उल्लेखनीय कार्य मॅडमचे आहे. आजपर्यंत चकलंबा केंद्रातील प्रा. शा. कासारवाडी व प्रा. शा. रसुलाबाद येथील मॅडमचे कार्य उत्कृष्ट असल्याने व पुरस्कार प्राप्त झाल्याने मॅडमचे तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी,शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक,शिक्षक,व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य, सरपंच यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. ०१जानेवारी रोजी जिल्हा परिषद बीड आदर्श शिक्षक पुरस्कार राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, खासदार बजरंग सोनवणे, आ.सुरेश धस, आ.प्रकाश सोळंके, आ. विजयसिंह पंडित,आ. संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितेन रहेमान, शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर शिक्षणाधिकारी (मा.), प्रियाराणी पाटील व सर्व सन्माननीय यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण झाले. या पुरस्काराबद्दल सर्वच स्तरातून श्रीमती शोभा दळवी यांचे अभिनंदन होत आहे.

## तलवाडा ग्रामपंचायतचे...

समस्येकडे लक्ष वेधू इच्छितो की, आज दिनांक ०१.०१.२०२६ रोजी देखील अनेक गरजु कुटूंबाची घरकुलांची कामे निधी अभावी रखडलेली आहे. तलवाडा ता. गेवराई जि. बीड येथील अनेक लाभार्थ्यांनी त्यांच्या घरकुलांची बांधकामे सुरू केली आहेत. परंतू पुढील हप्ते वेळेवर न मिळाल्याने बांधकामे अर्धवट अवस्थेत आहे. तरी मा. पालकमंत्री महोदय यांनी संबंधीत विभागाला आदेशीत करून घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर निधी जमा करून घरकुल लाभार्थ्यांना न्याय द्यावा आशी मागणी सार्वजनिकरित्या तलवाडा ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच आक्रम सौदागर(आज्जुभाई) यांनी केली होती. त्यांच्या निवेदनाची बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार आजीतदादा पवार यांनी दखल घेत संबंधित विभागाला सुचीत केल्याने अवघ्या २४ तासात तलवाड्यातील लाभार्थ्यांच्या खात्यावर थकीत हप्ते लागलीच जमा होण्यास सुरवात झाले असून तलवाडा येथील लाभार्थी उप सरपंच आक्रम सौदागर यांना धन्यवाद देत आहे.

## संताची सेवा...

व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित पौर्णिमा निम्मित कीर्तन सेवेत व्यक्त केले या वेळी पंचक्रोशीतील टाळकरी, भजनी मंडळी, गायनाचार्य, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पाटोदा तहसील...

बोलावण्यात यावे, अशी मागणी उपस्थित नागरिकांकडून करण्यात येत होती. मात्र बराच वेळ उपचार न मिळाल्याने घोड्याची अवस्था अधिकच गंभीर होत गेली आणि काही वेळातच त्याने प्राण सोडले.तहसील कार्यालयासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी पशुवैद्यकीय मदत उपलब्ध

◆ पान ४ वरून पुढे...

नसणे, तसेच आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ उपचाराची कोणतीही व्यवस्था नसल्याबाबत नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घ्यावी व भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## भिमाकोरेगाव ही ...

मधील सैनिकांच्या खाद्यावर हे भीमा कोरेगाव विजय स्तंभाचे प्रतीक आहे, व नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ आक्टोबर १९५६ ला बुद्ध धम्माची दिक्षा देऊन आपला मार्ग युद्धाचा नाही तर बुद्धाच आहे हे सांगितले पण आज सर्वत्र महार म्हूणन अभिमान असल्याचे स्टेटस सर्वच लोक ठेवतात परंतु आपली ओळख आता महार नसून बौध्द आहोत असे मनोगत व्यक्त केले. त्यावेळी आयु डी एम राऊत,ड तेजस वडमारे, निलेश वाघमारे,अंजली वडमारे, कोमल वाघमारे, वर्षा खेमाडे, शिवकन्या खेमाडे, आशाबाई खेमाडे, हौसाबाई वाघमारे, सविता डोळस, दिपाली जाधव सोनाली अंकुटे जयश्री गवळी, फुलमाई इंगळे,कुसुम साळवे,वैजेनाथ साळवे, दिलीप गवळी, प्रेम जोगदंड, नितीन वाघमारे, छबू जाधव,आशाबाई भालेराव, व परिसरातील बालक बालिका उपस्थित होते.

## सादोळा शिवारात...

सुमारे ६ लाख ४२ हजार ६०० रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी सादोळा येथील शेतकरी विठ्ठल पांडुरंगराव सोळंके (वय ३७, व्यवसाय शेती) यांनी माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, गोदावरी नदीपात्रातून शेतात पाणी उपसा करण्यासाठी बसवलेल्या विद्युत मोटारींच्या स्टाटरपासून मोटारीपर्यंत लावलेल्या कॉपर वायर अज्ञात चोरट्यांनी कशाने तरी कट करून बाजूच्या शेतात जाळून त्यातील तांबे काढून नेला.ही चोरी दिनांक ३० डिसेंबर २०२५ व १ जानेवारी २०२६ रोजी पहाटे १ ते ५ या वेळेत घडल्याचे निष्पन्न झाले आहे. सकाळी मोटार सुरू करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना वायर गायब असल्याचे लक्षात आले. त्यानंतर गावातील इतर शेतकऱ्यांनी तपासणी केली असता अनेकांच्या मोटारींच्या वायर चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे सादोळा शिवारातील ऊस व केळी पिकांना पाण्याचा मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. अज्ञात चोरट्यांविरोधात माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल रामकिसन गोपीनाथ राठोड (कछ ९२१) करत आहेत.दरम्यान, वारंवार होणाऱ्या वायर चोरीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढत असून पोलिसांनी तातडीने चोरट्यांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## नंदकिशोर मुंदडा...

करण्यात येणार आहे. अंबाजोगाई नगर परिषदेची नगराध्यक्ष ही सुरुवातीपासूनच खुप अटीतटीची होईल असे वाटत होते. मतदानानंतर २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होत असतांना नंदकिशोर मुंदडा यांनी पहिल्या फेरीत घेतलेली आघाडी सर्वच प्रभागात कायम ठेवत राजकिशोर मोदी यांचा २५१० मतांनी सरळ पराभाव केला. नगराध्यक्ष पदाची निवडणूक जिंकल्यानंतर नंदकिशोर मुंदडा यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपचार घेण्यासाठी मुंबई ला जावे लागले. येथील उपचार प्रक्रिया पुर्ण करुन नंदकिशोर मुंदडा हे शनिवारी रात्री उशिरा अंबाजोगाईत पोहोचणार असून रविवारी विश्रांती घेवून सोमवारी सकाळी १२:३० नंतर ते नगराध्यक्ष पदाचा रितसर पदभार स्विकारणार असल्याची माहिती शहर परीवर्तन जनविकास आघाडीच्या वतीने देण्यात आली आहे.

शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक – नंदकिशोर मुंदडा यांनी आपल्या आयुष्यात नगराध्यक्ष पदाची पहिली निवडणूक लढवली व ते मोठ्या मतांनी विजयी ही झाले. त्यांच्या विजयाचा आनंदोत्सव शहरातील लोकांना सहज साजरा करता यावा यासाठी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्विकारण्यापुर्वी त्यांची हजारो समर्थकांसह शहरातील सर्व प्रमुख मार्गावरून विजयी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

सदरील विजयी मिरवणूक मध्ये सत्कार समारंभ हा खालील चौकाप्रमाणे आयोजित करण्यात आला आहे.छत्रपती चौक – जोगाईवाडी ग्रामपंचायत, छत्रपती चौक – अमोल पवार,गौरव लामतुरे, गोपाळ मस्के मित्रपरिवार, राजीव गांधी चौक प्रताप देवकर, नाईक चौक – गोकुळ कदम व ग्रामीण पदाधिकारी मोंढा – सर्व व्यापारी वर्ग, मोंढा कमान – राजू भन्साळी सेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक – किशोर कुमार परदेशी, गुरुवार पेठ – समीर लाटा, दीपक सुरवसे, अँड. मोटेगावकर, मोहसीन शेख, बबलू सिद्दिकी ,अक्षय भुमकर, अनुपम गारमेंटस –प्रताप देवकर, सचिन इंगळे योगेश्वरी मंदिर – सारंग पुजारी, पाटील चौक – किरण भालेकर शोएब कुरेशी, बलूत्याचा मळा – कल्याण अण्णा काळे, तानाजी मालुसरे चौक – श्रीकांत धायगुडे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक – महेश अंबाड,संजय गंभीरे, बाळासाहेब ठाकरे चौक – निशिकांत पाचेगावकर, अहिल्या माता चौक – गणेश देशमुख, नगर परिषद – गोविंद शिंपले, सावरकर चौक बाळु भराडीया, गोविंद तापडिया, नागनाथ साबणे, अभिमन्यु वैष्णव, राहुल शेटे, डीडवाणी व शेळके परिवार तसेच सर्व मंगळवार पेठ नागरिक.

लिफ्ट सुरू; दालन दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर – नंदकिशोर मुंदडा यांना नगराध्यक्ष पदाचा पदभार नगर परिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी प्रियांका टोंगे या देणार असून पदभार स्विकारण्यापुर्वी नगर परिषदेच्या प्रशासनाने गेली अनेक दिवसांपासून लिफ्ट बसवण्याचे काम पुर्ण केले असून या लिफ्ट च्या लोकार्पणाचा सोहळा नुतन नगराध्यक्ष नंदकिशोर मुदडा यांच्या हस्ते होणार आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# अजितदादांनी बीडच्या कलावंत व रसिकांना पावले!

## यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासाठी ८ कोटी १९ लाखांचा निधी मंजूर; बीडकरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

शहराच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी पालकमंत्री अजितदादा पवार यांनी तब्बल ८ कोटी १९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून, नववर्षाच्या सुरुवातीलाच बीडच्या कलावंत व रसिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. एप्रिल २०२५ मध्ये नाट्यगृहात पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या युवक मेळाव्यानंतर नाट्यगृहातील गंभीर दुरवस्था समोर आली होती. तुटलेल्या काचा, मोडलेल्या खुर्च्या, मेकअप रूममधील अपुरी विद्युत व्यवस्था, स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था अशा अनेक समस्या या वेळी निदर्शनास आल्या. या बाबी आमदार विजय सिंह पंडित तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व संयोजक बळीराम गवते यांनी पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. या वेळी



अजितदादांनी नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी निधी देण्याचे आश्वासन दिले होते. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी भूमिपूजन कार्यक्रमानिमित्त आयोजित जाहीर सभेत शासन आदेश दाखवत त्यांनी निधी मंजूर झाल्याची अधिकृत घोषणा केली. या निर्णयाचे नाट्यगृह बचाव समिती, सामाजिक कार्यकर्ते तसेच शहरातील नाट्यकलावंतांनी स्वागत करत पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. नाट्यगृहाच्या प्रश्नाला सातत्याने शासन दरबारी वाचा फोडणाऱ्या प्रसारमाध्यमांचेही डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी विशेष आभार मानले आहेत.

# अनादरीत धनादेशा प्रकरणी आरोपीस दहा लाख रुपये दंड व सहा महिने शिक्षा: ॲड. शशिकांत सावंत

**बीड । प्रतिनिधी**

येथील अतिरिक्त मुख्य दंडाधिकारी साहेब आठवे यांनी महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपीस तब्बल दहा लाख रुपयाचा दंड करून सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे, घटनेची हकीकत अशी की, आरोपी पंचफुला मधुकर जगताप,यांनी फिर्यादी सुनील मुरलीधर जगताप,यांच्याकडून दिनांक १२ /०८/ २०२१ रोजी रक्कम रुपये दहा लाख रुपये हात उसने म्हणून घेतले होते सदरची रक्कम परत करतेवेळी आरोपी यांनी फिर्यादी यांच्या हक्कांमध्ये रक्कम रुपये दहा लाख रुपयाचा युनियन बँक ऑफ इंडिया चा धनादेश दिला होता सदरचा धनादेश बँकेत वाटेल व फिर्यादीस त्याची आरोपीकडे असणारी रक्कम त्यास मिळून



जाईल असा शब्द व भरवसा दिला होता, परंतु सदरचा धनादेश बँकेत अनादरीत झाला व खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही या कारणाने परत आला त्यामुळे फिर्यादी सुनील जगताप,यांनी आरोपी पंचफुला मधुकर जगताप यांच्या विरोधामध्ये बीड येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांचे न्यायालयात समरी क्रिमिनल केस क्रमांक. १८४३/२३ सुनील विरुद्ध पंचफुला असे प्रकरण दाखल केले सदर प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने गुणदोषावर प्रकरण चालून सदर प्रकरणांमध्ये आरोपीने कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्ट प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपी पंचफुला मधुकर जगताप, यांना दहा लाख रुपये दंड व सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे सदर प्रकरणात फिर्यादीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी भक्कम बाजू मांडली, त्यांना ॲड. विशाल विलासराव कदम,ॲड. अभिषेक बहिर,ॲड. माऊली डाके ॲड. राजकुमार धरणे,ॲड. मुकुंद लोणकर ॲड. प्रदीप दराडे ॲड. विजय डोके,ॲड. अमोल तिडके,ॲड. प्रतीक गव्हाणे यांनी सहकार्य केले.

# दोन धारदार तलवारींसह तलवाड्याचे तिघे गजाआड

## तीर्थपुरी पोलिसांची उत्तम कामगिरी पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**तलवाडा । प्रतिनिधी**

तीर्थपुरी पोलीस ठाण्याच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे धडकेबाज कारवाई करत दोन धारदार तलवारी व एक पांढऱ्या रंगाची विनाक्रमांकाची स्विफ्ट कार असा एकूण ५ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई घनसावंगी तालुक्यातील तीर्थपूरी येथील मत्योदरी कॉलेजच्या पाठीमागील संभाजीनगर वस्ती परिसरात गुरुवारी (दि.१) रोजी करण्यात आली. पोलीस ठाणे तीर्थपुरी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली पवार व पथकास आज सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मत्योदरी विद्यालयासमोर रस्त्याच्या बाजूला एक पांढऱ्या रंगाची विनाक्रमांकाची स्विफ्ट





कारमध्ये तीन ते चारजण धारदार तलवारी बाळगून फिरत आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथक तत्काळ घटनास्थळी रवाना झाले. पोलीसांना पाहताच संबंधित स्विफ्ट कारमधील आरोपींनी गाडी कॉलेजच्या दिशेने पळवली. पोलिसांनी पाठलाग केला असता, मत्योदरी कॉलेजच्या पाठीमागे संभाजीनगर वस्ती येथे आरोपींनी गाडी सोडून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून तिघांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे बाळू लक्ष्मण फुलारे (वय ३५), अजय साहेबराव कुऱ्हाडे (वय २७) व शिवदास साहेबराव शिंदे (वय ३२ सर्व रा. तलवाडा, ता. गेवराई तालुका, जि. बीड) अशी आहेत. पंचासमक्ष तपासणीदरम्यान गाडीतून दोन लाकडी मुठी व लोखंडी पाते असलेल्या धारदार तलवारी तसेच एक पांढऱ्या रंगाची विनाक्रमांकाची स्विफ्ट कार असा एकूण ५,०२,००० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. हा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरुद्ध पोलीस ठाणे तीर्थपुरी येथे भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी वैशाली पवार, उपनिरीक्षक प्रतिभा पठाडे, कॉन्स्टेबल चव्हाण, माळी, पवार, मंडलीक, गोपनीय शाखेचे महेश तोटे,व चालक जाटे यांच्या पथकाने ही कारवाई केली.


## जाहिर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १९१८/२०२५**

अर्जदार :– **१. शिवराम पि. लहानु ढेरे, ५० वर्षे, धंदा शेती, रा. पाली, ता. जि. बीड, २. रमेश पि. लहानु ढेरे, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३.मंगल भ्र. विष्णु ढेरे, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ४. संजय पि. विष्णु ढेरे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ५. राणी भ्र. बाळासाहेब औटे, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ६.स्वाती भ्र. अशोक लोखंडे, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. बाळापुर, ता.जि.बीड, ७. मनिषा अशोक धायगुडे, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. सिरसदेवी, ता. गेवराई, जि. बीड,८.राजु पि. प्रकाश ढेरे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. पाली, ता. जि. बीड, ९. रंजना भ्र. प्रकाश ढेरे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, १०.सुनंदा भ्र. सखाराम चव्हाण, वय ५८ वर्षे, धंदा – घरकाम, रा. कोळवाडी, ता. जि. बीड, ११. सरसाबाई भ्र. लहानु ढेरे, वय ६७ वर्षे, धंदा घरकाम, रा. पाली, ता.जि.बीड,**

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी मयत नामे **लहानु पि. राणुजी ढेरे हे / हया दिनांक २१/०५/२०१४ रोजी पाली, ता.जि.बीड** येथे मयत झालेले असुन अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क.३ व ९ या मयताच्या मयत मुलाच्या पत्नी म्हणजेच मयताच्या सुना आहेत. अर्जदार क.४ ते ८ हे मयताचे नातु आहेत. अर्जदार क. १० ही मयताची विवाहित मुलगी आहे. अर्जदार क. ११ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्धलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: १८/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील तारीख :– २९/०१/२०२६.**

**( मार्फत विधिज्ञ:– ॲड एस बी खाडे )**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १९२३/२०२५**

**राजु पि. प्रकाश ढेरे व इतर वि. निरंक**

मागणी :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

**अर्जदारः (१) राजु प्रकाश ढेरे, (२) आदर्श अशोक ढेरे अ.पा.क. आई मिना अशोक ढेरे (३) अमृता अशोक ढेरे अ.पा. क आई मिना अशोक ढेरे (४) आराध्या अशोक ढेरे अ.पा. क आई मिना अशोक ढेरे (५) मिना अशोक ढेरे, (६) रंजना प्रकाश ढेरे, (७) सरस्वती लहानु ढेरे, सर्व रा. पाली ता. जि. बीड**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी **मयत नामे प्रकाश लहानु ढेरे हे दिनांक ०९/०७/२०१५ रोजी मयत झालेले आहेत.**

अर्जदार क. १ हा मयताची मुलगा असून अर्जदार क. २ व ४ हे मयताचे नातु आहेत. तसेच अर्जदार क. ५ मयताची सुन व अर्जदार क ६ पत्नी व अर्जदार क ७ आई आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

सदरहु मयत नामे प्रकाश लहानु ढेरे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत प्रकाश लहानु ढेरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **सदर प्रकरणात पुढील तारीख २८/०१/२०२६ आहे.**

आज दिनांक ०१/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचें शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ ॲड एस. बी. खाडे)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जाहिर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज २००४/२०२५**

**शेख नादानबी विरूध्द निरंक**

अर्जदार – **१. शेख नादानबी भ्र. शेख महेबुब, वय – ६७ वर्षे, धंदा – घरकाम, रा. कुर्ला ता. जि. बीड, २. शेख अजिम पि. शेख महेबुब, वय – ५० वर्षे, धंदा मजुरी रा. सदर ३. शेख अल्लाउददीन पि. शेख महेबुब, वय – ४८ वर्षे, धंदा मजुरी, रा. सदर, ४. शेख मैनोददीन पि. महेबुब, वय – ४४ वर्षे, धंदा मजुरी, रा. सदर, ५. सय्यद तमीज भ्र. सय्यद गुलाब, वय – ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. ताकडगांव ता. गेवराई जि. बीड**

विरुध्द निरंक

मागणी– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत शेख महेबुब शेख दादामिया** यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत **शेख महेबुब शेख दादामिया यांचा मृत्यु दिनांक १२/१०/२०१२** रोजी झाला आहे. वरील अर्जदारा क्र. १ ते ५ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत शेख महेबुब शेख दादामिया यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क. १ ते ५ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत शेख महेबुब शेख दादामिया** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/१२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १०/०२/२०२६ आहे.**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ८६३/२०२५**

**भरत रामराव बासर विरुध्द ग्रा.पं.कार्या.चऱ्हाटा**

**पहा,**

**१. भरत रामराव बासर, रा. चऱ्हाटा, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **जन्म धारक भरत रामराव बासर यांचा दिनांक** ०२/११/१९८४ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्म ची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **चऱ्हाटा** ता. बीड येथील जन्म रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **चऱ्हाटा** ता. जि. बीड येथील जन्म रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०१/२०२६ ही आहे.**

शिक्का | (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती ए. बी. निवारे १० वे सह दिवाणी न्यायाधीश यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १९५६/२०२५**

**जनार्धन विरुध्द बप्पा**

अर्जदार :–१) जनार्धन गणपत ढेकळे वय ७२. धंदा शेती रा. तिप्प्टवाडी, ता. जि. बीड (२) सुमनबाई खंड कोळेकर, वय ७५. धंदा घरकाम रा. तिप्प्टवाडी, ता. जि. बीड **विरुध्द बच्चा गणपत ढेकळे**

**मागणी अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत गणपत राजी ढेकळे, रा. तिप्पटवाडी ता. जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत गणपत भूरानी बेकळे, रा. तिप्पटवाडी ता. जि. बीड यांचा मृत्यु द. ०२/०७/२००० रोजी रा. तिप्पटवाडी ता. जि. बीड** येथे झाला आहे. अर्जदार १ व गैरअर्जदार हे मयाचे मूल असून अर्जदार क. २ ही मयताची विवाहीत मुली आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थ सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत गणपत धूरानी ढेकळे, रा. तिप्पटवाडी ता. जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २० माहे डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९ जानेवारी २०२६.**

**(अँड. साळवे एस. एस. यांच्यामार्फत)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. मा.ये.वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९१२/२०२५**

**केशरबाई मुळीक वि. निरंक**

**भिमराव पि.गणपती शिंदे,** हे दिनांक ११/०९/२०२५ रोजी बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेला आहे, आणि तसेच अर्जदार–

१. शोभा भ्र. भिमराव शिंदे, वय ४५ वर्षे, धंदा. घरकाम, रा. बजरंग नगर, कॅनॉल रोड, बीड, ता.जि. बीड २. आकाश पि.भिमराव शिंदे, वय.२९ वर्षे, धंदा. शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, ३. दिपक पि. भिमा शिंदे, वय.२८ वर्षे, धंदा. शिक्षण, रा.वरीलप्रमाणे ,४. सौ. पायल भ्र. किरण कदम, वय.२३ वर्षे, धंदा. घरकाम, रा. सौंदाण, ता. पाटोदा, जि. बीड

अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत, अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/ अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे भिमराव पि.गणपती शिंदे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २२/०१/२०२६ ही आहे.**

आज दिनांक ०१ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**(ॲड. मनिषा अ. गडकर यांचे मार्फत)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १४९/२०२५**

**शेख गुलाब बाबामिया विरुध्द मुख्या.न.प.बीड**

**पहा, १.शेख गुलाब बाबामिया, रा.इस्मालपुरा, बीड ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मदीनाबी बाबामिया शेख यांचा दिनांक १८/०६/२०१४ रोजी** मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **खंडाळा** ता. बीड येथील मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **खंडाळा** ता. जि. बीड येथील मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख २९/०१/२०२६ ही आहे.**

शिक्का | (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १५२/२०२५**

**दिनेश जनार्दन पवार विरुध्द ग्रा.प.कार्या.खंडाळा**

**पहा, १. दिनेश जनार्दन पवार, रा.खंडाळा, ता.जि. बीड (ह.मु. चेंबुर मुंबई)**

उपरोक्त प्रमाणे मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **जनार्दन यादवराव पवार यांचा दिनांक १९/०७/२०२४ रोजी** मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **खंडाळा** ता. बीड येथील मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **खंडाळा** ता. जि. बीड येथील मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०१/२०२६ ही आहे.**

शिक्का | (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १५३/२०२५**

**विजय निवृत्ती पवार विरुध्द ग्रा.प.कार्या.खंडाळा**

**पहा,**

**१. विजय निवृत्ती पवार , रा.खंडाळा, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **हौसाबाई निवृत्ती पवार यांचा दिनांक १७/१०/२०१७ रोजी** मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **खंडाळा** ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **खंडाळा** ता. जि. बीड येथील मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख २०/०१/२०२६ ही आहे.**

शिक्का | (स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**

e-mail -tahsildar georai2@gmail.com

**दिनांक २८.०९.२०२५**

दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–

प्रती,

१ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा

२. ग्राम महसूल अधीकारी कुंभेजळगाव

विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.

संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८१)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. **अर्जदार भरत नानासाहेब लेंडगूळे, रा. कुंभेजळगाव ता गेवराई जि बीड** यांचा अर्ज दिनांक १०.०९.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०१ अर्जदार **भरत नानासाहेब लेंडगूळे, रा. कुंभेजळगाव ता गेवराई जि बीड यांचा मूलगा लेंडगूळे सूरज भरत यांचा जन्म दिनांक २३.११.२००७ रोजी झालेला** आहे. काही कारणास्तव ग्राम पंचायत कार्यालय कुंभेजळगाव येथे नोंद झाली नाही, करीता जन्म नोंद आदेशाची मागणी या कार्यालयास केलेली आहे.

संदर्भ क्र ०१ चे शासन निर्णय दिनांक १२.०३.२०२५ मध्ये जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो२५२६/ ईऑ९ ९१ १८१)/प्र.क्र. २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो. स्टें गेवराई/ पाचेगाव / जयराम तांडा यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी **कुंभेजळगाव** यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तुस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का | (स्वाक्षरीत) तालुका दंडाधिकारी, गेवराई

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. ०४ जानेवारी २०२६ ● पान ४



*माजलगाव बीड सातारा जिल्ह्यातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी नायगाव येथे स्त्री शिक्षणाच्या आद्यजनक सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब, माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, आ. मनोज कायंदे, समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य चॅड. सुभाष भाऊ राऊत आदी दिसत आहेत.*



*कै बाबा साहेबवराट वाचनालयात राज माता जिजाऊ मा साहेब व सावीत्रीबाई फुले जयंती उतसाहात साजरी गेवराई तालयुकयातील कै बाबासाहेब वराट सार्वजनिक वाचनालय बराहाणपुर ता गेवराई जि बीड याच्या विदयामाने आयोजित केलेलया कार्य करमास वचछलाबाई पवार सुवर्णा पवार आसराबाई शेडगे भामाबाई वराट वाचलयाचे अधिशक भागवत वराट सुभाष घोडके पांडुरंग पवार महादेव यादव शामराव ठोकरे याच्या सह बहुसखे वाचक उपस्थित होते भागवत वराट यांनी मार्गदर्शन पर भाषण केले तर आभार प्रदर्शन परदिपकसबे यांनी केले*

# संत वामनभाऊ महाराजांचा 50 वा सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळा उत्साहात सुरु

## आ.सुरेश धस यांच्या हस्ते पूजन



**आष्टी । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीनिमित्त भव्य धार्मिक सोहळ्याला आजपासून भक्ति भावपूर्ण वातावरणात सुरुवात झाली आहे. या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित सप्ताहाच्या प्रारंभी आ. सुरेश धस तसेच गडाचे महंत ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. या पावन प्रसंगी श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी पादुकापूजन, समाधीपूजन तसेच पारंपरिक पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आ.सुरेश धस यांनी या सर्व धार्मिक विधींमध्ये सहभागी होत संतांच्या चरणी मनोभावे दर्शन घेतले. श्री संत वामनभाऊ महाराज यांचा जन्म इ.स. १८९१ मध्ये झाला असून २४ जानेवारी १९७६ रोजी त्यांनी देहत्याग केला. त्यानंतर २५ जानेवारी १९७६ रोजी त्यांची समाधी स्थापन करण्यात आली. या ऐतिहासिक ▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंचा स्वखर्चातून लोकसेवेचा उपक्रम;

# मोरगाव–जाधववस्ती रस्ता झाला सुलभ!

**● निधीअभावी जनतेचे हाल होऊ देणार नाही: राजेंद्र मस्के**



**बीड । प्रतिनिधी**

पाटोदा–मांजरसुंभा मुख्य रस्त्यावरील मोरगाव ग्रामपंचायती अंतर्गत जाधववस्तीला जोडणाऱ्या रस्त्यावर आठ नळ्यांच्या नळकांडी पुलाच्या कामाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी वामन जाधव, तुकाराम कागदे, आण्णासाहेब कागदे, सचिन जाधव, मजूर फेडरेशनचे संचालक बद्रीनाथ जटाळ, गणपत जाधव, भारत जाधव, बाबासाहेब काकडे, दादाहरी काकडे, सयाजी काकडे, गोविंद काकडे, बाबुराव कागदे, अतुल जाधव, बाबासाहेब जाधव, विश्वंभर जाधव, सतीश जाधव, बाळू जाधव, संतराम कागदे, अशोक कागदे, उद्धव जाधव, राजेंद्र वामने आदी ग्रामस्थ उपस्थित होते. मोरगाव ग्रामपंचायत०अंतर्गत साधारण अडीचशे लोकसंख्येची जाधववस्ती मांजरसुंभा–पाटोदा महामार्गा लगत आहे. मांजरसुंबा पाटोदा महामार्ग रस्त्याची उंची वाढल्याने ▶ उर्वरित पान २ वर

# श्रीमती शोभा दळवी यांना बीड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार

**● उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते सन्मान**



**गेवराई । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ यंदा गेवराई तालुक्यातील कर्तव्यनिष्ठ शिक्षिका श्रीम. शोभा सुरेश दळवी मॅडम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रसुलाबाद यांना जाहीर करण्यात आला. दि.१ जानेवारी २०२५ रोजी बीड येथे पार पडलेल्या भव्यसमारंभात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते हा सन्मान श्रीमती दळवी यांना प्रदान करण्यात आला. सध्या श्रीमती दळवी मॅडम या जिल्हा परिषद माध्यमिक शाळा उमापुर येथे कार्यरत ▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा ग्रामपंचायतचे उपसरपंच आक्रम सौदागर यांच्या निवेदनाची अवघ्या २४ तासात दखल

### तलवाडा येथील घरकुलाचे थकीत हप्ते लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यासह तालुक्यातील तलवाडा येथील पी एम वाय व रमाई घरकुल योजनेचे उर्वरित हप्ते गेल्या आणेक महिन्या पासुन लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग होत नसल्याने घरकुल लाभार्थी मेटाकुटीला आल्याची बाब तलवाडा ग्रामपंचायतचे सिंघम उपसरपंच आक्रम सौदागर (आज्जुभाई) यांच्या निदर्शनास आल्याने याबाबत पाठपुरावा करत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार अजितदादा पवार यांची बीड येथे भेट घेऊन घरकुलाचे थकीत हप्ते लाभार्थीच्या खात्यावर वर्ग व्हावे यासाठी निवेदन दिले असुन दिलेल्या निवेदनात म्हण्टले आहे की तलवडा ता. गेवराई जि. बीड येथील प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या ▶ उर्वरित पान २ वर

# संताची सेवा केली की आशिर्वाद नक्की मिळतो: ह भ प स्वामी योगीराज महाराज रामगडकर

**● श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे पौर्णिमे निम्मित कीर्तन संपन्न**



**श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे १३ जानेवारी मंगळवार रोजी धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे**

**बीड । प्रतिनिधी**

गोरक्षनाथ टेकडी हि नाथांची तपोभूमी आहे या ठिकाणी गोरक्षनाथ महाराज, साधू बाबा महाराज, गुरूवर्य सदगुरू किसान बाबा महाराज, यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या व गुरुवर्य शांतीब्रम्हे नवनाथ बाबा महाराज यांच्या तपाने पुनीत झालेली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी हि संत भूमी आहे संताची सेवा केली की आशिर्वाद नक्की मिळतो असे अभंग विवेचन ह भ प स्वामी योगीराज महाराज यांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे पौष महिन्यातील पौर्णिमे निम्मित कीर्तन सेवेत संपन्न करताना व्यक्त केले.

पौष महिन्यातील पौर्णिमा पंगत की गुरुवर्य शांतीब्रम्हे नवनाथ बाबा महाराज यांच्या जन्म भूमी काळेगाव हवेली येथील ग्रामस्थांची होती अभंग विवेचन करताना ह भ प स्वामी योगीराज महाराज रामगडकर यांनी सांगितले की संताचा जन्म जन सामन्याचे दुःख कमी करण्यासाठी झालेला असतो संत हे कल्पवृषा प्रमाणे असतात झाड हे झाड लावणारा व झाड तोडणारा यांच्यात भेद करत नाही सर्वांना सावली देतात तस संत सर्वांना सुख देतात संत कल्पतरू वृक्षा प्रमाणे आहे. बीड हि संताची भूमी आहे.संत नगद नारायण महाराज संत बँकटस्वामी महाराज, संत राम बाबा महाराज, संत वामन भाऊ महाराज, संत माऊली दादा, संत सदगुरू किसान बाबा महाराज, शांती ब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या तपाने अनेक दुःखी जनाचे जीवनाचे कल्याण झाले. तुम्हालाही तुमच्या जीवनाचे कल्याण करायचे असेल तर संत सेवा हीच जीवनच कल्याण करू शकते असे अभंग विवेचनात ह भ प स्वामी योगीराज महाराज रामगडकर यांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे पौर्णिमा निम्मित संत किसानबाबा महाराज यांच्या कृपाशीर्वादाने ▶▶ उर्वरित पान २ वर

## पाटोदा तहसील कार्यालयाच्या आवारात उपचाराअभावी घोड्याचा तडफडून मृत्यू



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तहसील कार्यालयाच्या आवारात आज एक हृदयद्रावक घटना घडली. एका घोड्याची प्रकृती अचानक बिघडल्याने तो जमिनीवर तडफडत होता. मात्र वेळेत पशुवैद्यकीय उपचार न मिळाल्यामुळे अखेर त्या घोड्याचा मृत्यू झाला.घटना घडत असताना परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. तातडीने पशुवैद्यकीय डॉक्टरांना ▶ उर्वरित पान २ वर

## भिमाकोरेगाव ही स्वाभिमानाची लढाई होती: आयु डी जी वानखेडे

### धम्मदीप बुद्ध विहार बीड येथे शौर्यदिन साजरा करून नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

०१ जानेवारी २०२६ रोजी धम्मदीप बुद्ध विहार येथे मान्यवारांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर , छत्रपती शिवाजी महाराज माता रमाई यांना अभिवादन करून ५०० शूरवीर सैनिकांना मानावंदना देण्यात आली त्या नंतर नवनिर्वाचित नगरसेवक विनोदजी मुळूक व प्रमोद आण्णा शिंदे यांचा विहार कमिटी च्या वतीने शाल पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला त्या नंतर डी जी वानखेडे यांनी भिमाकोरेगाव येथील सिदनाकमहार यांच्या नेतृत्वात ५०० शूरवीर सैनिकांनी ०१ जानेवारी १८१८ रोजी पेशवाईचा अंत करून भीमाकोरेगाव युद्ध जिकले, त्या नंतर उद्धारकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी०१जानेवारी १९२७ रोजी भीमा कोरेगाव येथे भेट देऊन शूर सैनिकांना मानवंदना देऊन सांगितले तुम्ही शूरवीराची संतान आहात ही गोस्ट काल्पनिक नव्हे, तर भिमाकोरेगाव ला जाऊन बघा,तुमच्या पूर्वजाणची नावे तेथील विजय स्तंभावर कोरलेली आहेत,तो पुरावा आहे कि तुम्ही भेड बकरीची संतान नसून सिंहाचे छावे आहात... असे सांगून आपल्यातील स्वाभिमान जागृत करून, भारतीय सैन्य दलात महार रेजमेंट ही तुकडी स्थपणा केली त्या महाररेंजमेंट ▶ उर्वरित पान २ वर

## सादोळा शिवारात मोठ्या प्रमाणात विद्युत मोटार कॉपर वायर चोरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील सादोळा शिवारात गोदावरी नदीकाठच्या परिसरात अज्ञात चोरट्यांनी विद्युत पाण्याच्या मोटारीसाठी वापरल्या जाणाऱ्या कॉपर वायरची मोठ्या प्रमाणात चोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेत तब्बल ९० शेतकऱ्यांचे एकूण २१,४२० फूट जुने वापरते कॉपर वायर चोरीस गेले असून ▶▶ उर्वरित पान २ वर

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य

राष्ट्रीय रेबीज नियंत्रण कार्यक्रम

रेबीज हा एक जीव घेणा आजार आहे आपण हा आजार सहज टाळू शकतो



- कुत्रा किंवा इतर प्राणी चावल्यामुळे झालेली जखम साबण आणि नळाच्या वाहत्या पाण्याने स्वच्छ धुवा.
- जखमेला निर्जंतुक मलम लावा.



- जखमेला मिरची, तेल, चुना असे कोणतेही घातक पदार्थ लावू नका.
- ताबडतोब शासकीय दवाखान्यात जा आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने रेबीज विरोधी लस घ्या.



- लसीच्या वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करा.
- आपल्या घरातील पाळीव प्राण्यांचे वेळोवेळी रेबीज विरोधी लसीकरण करा.

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद, बीड

# नंदकिशोर मुंदडा सोमवारी घेणार नगराध्यक्ष पदाचा पदभार: शहरभर मिरवणूक; 18 चौकात होणार सत्कार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत राजकिशोर मोदी यांचा २५१० मतांनी पराभव केल्यानंतर नंदकिशोर मुंदडा आता सोमवारी ५ जानेवारी रोजी अध्य पदाचा पदभार स्विकारणार आहेत. पदभार स्विकारण्यापुर्वी अंबाजोगाई शहर परिवर्तन जनविकास आघाडीच्या वतीने त्यांची अक्षय निवासस्थानापासून शहरभर प्रचंड रॅली निघणार असून सदरील रॅलीदरम्यान १८ चौकात विविध मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार ▶▶ उर्वरित पान २ वर

### १८ चौकात होणार सत्कार!

**नंदकिशोर मुंदडा यांचा विजयोत्सव साजरा करण्यासाठी काढण्यात येणारी ही मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून नेण्यात येणार असून शहरातील १८ चौकात विविध मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. शहरातील विविध प्रभागात राहणा–या लोकांना आपल्या सोयीच्या चौकात येवून नंदकिशोर मुंदडा यांचा सहज सत्कार करता यावा यासाठी हे नियोजन करण्यात आले असल्याचे समजते.**

### कार्यालय अद्वावतीकरणाचे काम युध्दपातळीवर सुरू

**नगराध्यक्षांच्या कार्यालय अद्वावती करणाचे काम प्रशासनाने सुरु केले असून हे काम ही प्रगती पथावर असून येत्या काही दिवसांत या कार्यालयाचे काम पूर्ण करण्यात येणार असल्याचे नगर परीषद प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.**